Prepp
Your Personal Exams Guide

**MH SET 2011 SOCIOLOGY PAPER 2 NOVEMBER 27, 2011 QUESTION PAPER**

**NOV. - 14211/II**

# Sociology
## Paper II
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. In Marxian analysis, scientific knowledge, skill and technology employed in the process of production, is known as :

(A) Means of production

(B) Forces of production

(C) Mode of production

(D) Relations of production

2. The behaviour that violates the social norms of a given society is termed as :

(A) Social Disintegration

(B) Social Deviance

(C) Abnormal Behaviour

(D) Anti-Social Behaviour

1. मार्क्सवादी विश्लेषणात, शास्त्रीय ज्ञान, कौशल्ये आणि तंत्रज्ञान, उत्पादनाची प्रक्रिया म्हणून जेव्हा वापरले जातात तेव्हा त्याला काय म्हटले जाते ?

(A) उत्पादनाची साधने

(B) उत्पादनाची शक्ती

(C) उत्पादन प्रणाली

(D) उत्पादन संबंध

2. समाजाने घालून दिलेल्या सामाजिक नियमनांचा भंग करणारे वर्तन जेंव्हा होते तेव्हा त्याला कोणत्या संज्ञेने संबोधले जाते ?

(A) सामाजिक विस्कळितपणा

(B) सामाजिक विचलन

(C) अपसामान्य वर्तन

(D) समाज-विघातक वर्तन

[P.T.O.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



3. Whose theory of self emphasizes that, individual's self is the product of social interactions ?
   - (A) C. H. Cooley
   - (B) Max Weber
   - (C) Vilfredo Pareto
   - (D) B. F. Skinner

4. Which of the following factors makes clear the substance of Social Stratification ?
   - (A) Social Inequality
   - (B) Social Differentiation
   - (C) Social Categorization
   - (D) A system of evaluation, ranking and differential rewarding of roles in society

3. व्यक्तीचा 'स्व' ही सामाजिक आंतरक्रियेची निर्मिती आहे, यावर कोणाच्या 'स्व' विषयक सिद्धांतात भर देण्यात आला आहे ?
   - (A) सी.एच्. कूले
   - (B) मॅक्स वेबर
   - (C) विल्फ्रेड परेटो
   - (D) बी. एफ्. स्किनर

4. खालीलपैकी कोणता घटक सामाजिक स्तरीकरणाचा आशय स्पष्ट करतो ?
   - (A) सामाजिक विषमता
   - (B) सामाजिक विभेदन
   - (C) सामाजिक प्रवर्गीकरण
   - (D) समाजातील भूमिकांचे मूल्यमापन, श्रेणीनिश्चिती आणि त्यांना विभेदित पारितोषिके प्रदान करण्याची व्यवस्था

www.prepp.in



5. The process that regulates behaviour of the member of society is termed as :

(A) Social role

(B) Social prevention

(C) Social control

(D) Social engineering

6. Which one of the following is *not* a feature of caste system ?

(A) Exogamy

(B) Ritual hierarchy

(C) Purity and pollution

(D) Division of labour based on ascription

5. समाजातील व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करण्याच्या प्रक्रियेला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(A) सामाजिक भूमिका

(B) सामाजिक प्रतिबंध

(C) सामाजिक नियंत्रण

(D) सामाजिक अभियांत्रिकी

6. खालीलपैकी कोणते जाती व्यवस्थेचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) बहिर्विवाह

(B) धर्मविधीतील उच्चनीचता

(C) पवित्रता आणि अपवित्रता

(D) अर्पिततेवर आधारित श्रमविभाजन

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



7. Select the *correct* match :

   (A) **Anutoma**—Marriage between a higher caste woman with a lower caste man

   (B) **Pratiloma**—Marriage between a lower caste woman with a higher caste man

   (C) **Monogamy**—Marriage between one man and one woman

   (D) **Endogamy**—Marriage between persons of different Caste and Gotra

8. Which of the following is *not* true about education ?

   (A) Helps to raise one's social status

   (B) Helps to accelerate social mobility

   (C) Helps to promote social change

   (D) Helps to maintain social inequality

7. **योग्य** जोडीची निवड करा :

   (A) **अनुलोम**–उच्च जातीतील स्त्री आणि कनिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह

   (B) **प्रतिलोम**–कनिष्ठ जातीतील स्त्री आणि वरिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह

   (C) **एकविवाह**–एक स्त्री आणि एक पुरुष यांचा विवाह

   (D) **अंतर्विवाह**–विभिन्न जाती आणि गोत्र यांच्यातील व्यक्तींमधील विवाह

8. खालीलपैकी कोणते विधान शिक्षणाच्या बाबतीत खरे **नाही** ?

   (A) एखाद्याचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी सहाय्यभूत

   (B) सामाजिक गतिशीलता वाढविण्यासाठी सहाय्यभूत

   (C) सामाजिक परिवर्तनाला गतिमान करण्यासाठी सहाय्यभूत

   (D) सामाजिक असमानता टिकविण्यासाठी सहाय्यभूत

www.prepp.in



9. Which of the following is the primary agency of socialization ?

(A) College

(B) School

(C) Family

(D) Mass media

10. Who coined the term 'Primary Group' ?

(A) C. Cooley

(B) F. Tonnies

(C) H. Spencer

(D) R. Brown

11. Which of the following is relatively more important and broad component of culture ?

(A) Non-material culture

(B) Material culture

(C) Normative culture

(D) Cognitive culture

9. खालीलपैकी समाजीकरणाचे प्राथमिक साधन कोणते आहे ?

(A) महाविद्यालय

(B) शाळा

(C) कुटुंब

(D) प्रसारमाध्यमे

10. 'प्राथमिक समूह' ही संज्ञा सर्वप्रथम कोणी वापरली ?

(A) सी. कूले

(B) एफ्. टोनिस

(C) एच्. स्पेन्सर

(D) आर्. ब्राऊन

11. खालीलपैकी संस्कृतीचा कोणता घटक सापेक्षत: अधिक महत्वाचा आणि व्यापक आहे ?

(A) अभौतिक संस्कृती

(B) भौतिक संस्कृती

(C) नियमनात्मक संस्कृती

(D) बोधात्मक संस्कृती

www.prepp.in



12. Time gap that occurs when changes in material culture come more rapidly than non-material culture is known as :
    (A) Linear change
    (B) Cyclical change
    (C) Cultural diffusion
    (D) Cultural lag

13. Identity the *correct* statement :
    (A) Status is the dynamic aspect of social role
    (B) Social role is the dynamic aspect of social status
    (C) Social role can operate without social status
    (D) Status is dynamic while role is fixed

12. अभौतिक संस्कृतीपेक्षा भौतिक संस्कृतीत वेगाने परिवर्तन होत असताना जे अंतर निर्माण होते त्यास काय म्हणतात ?
    (A) एकरेषीय परिवर्तन
    (B) चक्रीय परिवर्तन
    (C) सांस्कृतिक प्रसरण
    (D) सांस्कृतिक पश्चायन

13. **योग्य** विधान कोणते ते ओळखा :
    (A) दर्जा हा सामाजिक भूमिकेचा गतीशील पैलू आहे
    (B) सामाजिक भूमिका ही सामाजिक दर्जाची गतीशील बाजू आहे
    (C) सामाजिक दर्जाशिवाय सामाजिक भूमिका पार पाडता येते
    (D) दर्जा हा गीतशील असतो, तर भूमिका ही स्थिर असते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



14. When two or more persons mutually influence each others' behaviour; the process is labelled as :

(A) Social Event

(B) Social Behaviour

(C) Social Action

(D) Social Interaction

15. Which term is used to denote the researches' bias in sample selection procedures ?

(A) Purposive Sampling

(B) Non-purposive Sampling

(C) Scientific Error

(D) Sampling Error

16. A predetermind list of questions to collect responses from the respondents is called :

(A) Interview

(B) Questionnaire

(C) Survey

(D) Observation

14. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात, ती प्रक्रिया म्हणजे :

(A) सामाजिक घटना

(B) सामाजिक वर्तन

(C) सामाजिक क्रिया

(D) सामाजिक आंतरक्रिया

15. नमुना-निवडीच्या पद्धतीबाबतच्या संशोधकाच्या पूर्वग्रहाचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) हेतूनिष्ठ नमुना-निवड

(B) अ-हेतूनिष्ठ नमुना-निवड

(C) शास्त्रीय प्रमाद

(D) नमुना-निवडीतील प्रमाद

16. उत्तरदात्यांकडून तथ्यसंकलनासाठी पूर्वनिश्चित केलेल्या प्रश्नांच्या सूचीला काय म्हणतात ?

(A) मुलाखत

(B) प्रश्नावली

(C) सर्वेक्षण

(D) निरीक्षण

www.prepp.in



17. Which of the following primarily acts as a formal agency of social control ?

(A) Association

(B) Education

(C) Law

(D) Reference Group

18. The measure of central tendency used to describe the most frequently occurring category of a non-numeric variable is termed as :

(A) Mean

(B) Median

(C) Correlation

(D) Mode

19. According to positivistic school, the researcher has to study social phenomena :

(A) Subjectively

(B) Objectively

(C) Emotionally

(D) Ethically

17. पुढीलपैकी प्रामुख्याने कोणते सामाजिक नियंत्रणाचे औपचारिक साधन आहे ?

(A) मंडळ

(B) शिक्षण

(C) कायदा

(D) संदर्भ समूह

18. बिगर-अंकीय परिवर्त्याच्या वारंवार येणाऱ्या प्रवर्गाचे वर्णन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या केंद्रीय प्रवृत्तीच्या मापन तंत्राला कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) मध्यमान

(B) मध्यांक

(C) सहसंबंध

(D) बहुलक

19. प्रत्यक्षवादी विचारप्रणालीनुसार संशोधकाने सामाजिक घटनांचा कसा अभ्यास करावा असा आग्रह असतो ?

(A) व्यक्तिनिष्ठपणे

(B) वस्तुनिष्ठपणे

(C) भावनात्मकतेने

(D) नैतिकतेनुसार

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



20. A statement about interrelationship between two variables in the context of a research question is termed as :
    (A) Concept
    (B) Hypothesis
    (C) Theory
    (D) Paradigm

21. In which process lower caste follows the higher caste ?
    (A) Civilization
    (B) Modernization
    (C) Sanskritization
    (D) Westernization

22. Gender is :
    (A) Biological Construct
    (B) Socio-Cultural Construct
    (C) Ecological Construct
    (D) Moral Construct

20. संशोधन समस्येच्या संदर्भात, दोन परिवर्त्यांमधील परस्परसंबंधांविषयी केलेल्या विधानाचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?
    (A) संकल्पना
    (B) अभ्युपगम
    (C) सिद्धांत
    (D) दृष्टिकोन

21. कोणत्या प्रक्रियेमध्ये कनिष्ठ जात वरिष्ठ जातीचे अनुकरण करते ?
    (A) नागरिकीकरण
    (B) आधुनिकीकरण
    (C) संस्कृतीकरण
    (D) पाश्चिमात्यीकरण

22. लिंगभाव म्हणजे :
    (A) जैविक रचित
    (B) सामाजिक-सांस्कृतिक रचित
    (C) पारिस्थितिक रचित
    (D) नैतिक रचित

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



23. The general standards in terms of which people decide about the behaviour as good or bad, right or wrong are referred to as :

(A) Relational Norms

(B) Regulative Norms

(C) Social Norms

(D) Cultural Values

24. Consider the following statements :

**Assertion (A) :**

The process of social change is a complex phenomenon in India

**Reason (R) :**

The Indian social structure witnessed rapid changes due to colonialism.

Of these two statements :

(A) Both **(A)** and **(R)** are true and **(R)** is the correct explanation of **(A)**

(B) Both **(A)** and **(R)** are true and **(R)** is not the correct explanation of **(A)**

(C) **(A)** is true but **(R)** is false

(D) **(R)** is true but **(A)** is false

23. व्यक्तीचे वर्तन चांगले की वाईट, चूक की बरोबर हे ठरविण्यासाठी लोक सामान्यत: जी मानके प्रमाण मानतात त्यांचा उल्लेख कोणत्या नावाने केला जातो ?

(A) संबंधात्मक नियमने

(B) नियमनात्मक नियमने

(C) सामाजिक नियमने

(D) सांस्कृतिक मूल्ये

24. खालील विधानांचा विचार करा :

**प्रतिपादन (A) :**

भारतात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही एक जटिल घटना आहे.

**कारण (R) :**

वसाहतवादामुळे भारतीय सामाजिक संरचनेने गतिमान परिवर्तनाचा अनुभव घेतला आहे.

(A) **(A)** आणि **(R)** ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि **(R)** हे **(A)** चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(B) **(A)** आणि **(R)** ही दोन्ही विधाने बरोबर आहे. पण **(R)** हे **(A)** चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) **(A)** बरोबर आहे पण **(R)** हे चूक आहे

(D) **(R)** बरोबर आहे पण **(A)** चूक आहे

www.prepp.in



25. According to Mead, an action that implies reaction is termed as :

(A) Gesture

(B) Social action

(C) Act

(D) Symbol

26. 'We belong to associations but not to institutions' means :

(A) Associations and institutions are opposed to each other

(B) Associations are group of people whereas institutions refer to set of rules and regulations

(C) Associations are modern and institution are traditional

(D) Associations are many and institutions are limited

25. ज्या क्रियेला प्रतिक्रिया अपेक्षित असते, अशा क्रियेकरिता मीड यांनी कोणती संज्ञा वापरली आहे ?

(A) हावभाव

(B) सामाजिक क्रिया

(C) कृती

(D) प्रतीक

26. "आपण मंडळांशी संबंधित असतो संस्थांशी नव्हे" म्हणजे :

(A) मंडळ आणि संस्था परस्परविरोधी असतात

(B) मंडळे म्हणजे लोकसमूह असतात, तर संस्था या नियमांचे आणि नियामक तत्वांचे संच असतात

(C) मंडळे आधुनिक आहेत तर संस्था या पारंपारिक असतात

(D) मंडळे ही अनेक असतात तर संस्था या मर्यादित असतात

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



27. Who is known for his concept of social action ?

(A) V. Pareto

(B) K. Marx

(C) E. Durkheim

(D) M. Weber

28. Consider the following statements :

**Assertion (A) :**

Social movements have generated an awareness among the deprived groups in India

**Reason (R) :**

These movements obstruct the process of economic development.

Of these two statements :

(A) Both **(A)** and **(R)** are true and **(R)** is the correct explanation of **(A)**

(B) Both **(A)** and **(R)** are true and **(R)** is not the correct explanation of **(A)**

(C) **(A)** is true but **(R)** is false

(D) **(R)** is true but **(A)** is false

27. सामाजिक क्रियेच्या संकल्पनेसाठी यापैकी कोण ओळखला जातो ?

(A) व्ही. परेटो

(B) के. मार्क्स

(C) इ. दुर्खिम

(D) एम्. वेबर

28. खालील विधानांचा विचार करा :

**प्रतिपादन (A) :**

सामाजिक चळवळीनी भारतातील वंचित समूहांमध्ये जाणीव जागृती निर्माण केली आहे.

**कारण (R) :**

या चळवळी विकास प्रक्रियेत अडथळा निर्माण करतात

या दोनपैकी :

(A) **(A)** व **(R)** ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि **(R)** हे **(A)** चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(B) **(A)** व **(R)** ही दोन्ही विधाने बरोबर आहे. पण **(R)** हे **(A)** चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) **(A)** बरोबर आहे पण **(R)** हे चूक आहे

(D) **(R)** बरोबर आहे पण **(A)** चूक आहे

www.prepp.in



29. The concept of 'Life-World' is associated with :

(A) G. H. Mead

(B) L. Althuser

(C) S. F. Nadel

(D) A. Schutz

30. Parsons's theory of 'social system' represents :

(A) Functionalist theory

(B) Conflict theory

(C) Interactionist theory

(D) Phenomenological theory

31. The term 'Ethnomethodology' is introduced by :

(A) G. H. Mead

(B) Coser

(C) Garfinkel

(D) Malinowski

29. 'जीव-जगत' ही संकल्पना खालीलपैकी कोणाशी संबंधित आहे ?

(A) जी. एच्. मीड

(B) एल. अल्थुसर

(C) एस्. एफ्. नॅडेल

(D) ए. शुट्झ

30. पार्सन्सचा 'सामाजिक व्यवस्थे'चा सिद्धान्त पुढीलपैकी कशाचे प्रतिनिधित्व करतो ?

(A) प्रकार्यवादी सिद्धान्त

(B) संघर्ष सिद्धान्त

(C) आंतरक्रियावादी सिद्धान्त

(D) मानसघटनाशास्त्रीय सिद्धान्त

31. 'लोकान्वयपद्धतीशास्त्र' ही संज्ञा कोणी प्रथम मांडली ?

(A) जी. एच्. मीड

(B) कोझर

(C) गारफिंकेल

(D) मॅलिनॉस्की

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



32. According to Durkheim, pre-industrial societies were held together by :
    (A) Organic Solidarity
    (B) Social Solidarity
    (C) Mechanical Solidarity
    (D) Group Solidarity

33. Who is the author of "The Rules of Sociological Method" (1895) ?
    (A) E. Durkheim
    (B) T. Parsons
    (C) R. Merton
    (D) R. Dahrendorf

34. Which thinker is known for his theory of Surplus Value ?
    (A) Dahrendorf
    (B) Max Weber
    (C) Wilfredo Pareto
    (D) Karl Marx

32. दुर्खिमच्या मते पूर्व-औद्योगिक समाज हे कशाच्या आधारे एकसंध ठेवले गेले होते ?
    (A) सेंद्रिय ऐक्यभाव
    (B) सामाजिक ऐक्यभाव
    (C) यांत्रिक ऐक्यभाव
    (D) समूह ऐक्यभाव

33. "दी रूल्स ऑफ सोशिऑलॉजिकल मेथड" (1895) हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?
    (A) इ. दुर्खिम
    (B) टी. पार्सन्स
    (C) आर. मर्टन
    (D) आर. डऱ्हेंडॉर्फ

34. अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताबद्दल कोणता विचारवंत प्रसिद्ध आहे ?
    (A) डऱ्हेंडॉर्फ
    (B) मॅक्स वेबर
    (C) विल्फ्रेडो परेटो
    (D) कार्ल मार्क्स

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



35. Which structuralist theorist put forth the "Alliance theory" which emphasizes the importance of marriage in society ?

(A) Nadel

(B) Radcliffe Brown

(C) Levi Strauss

(D) Karl Marx

36. In Marxian formulation 'class-in-itself' gets transformed into 'class-for-itself' by acquiring :

(A) Wealth

(B) Conflicting economic interest

(C) Class antagonism

(D) Class consciousness

35. संरचनावादी सिद्धांत मांडणाऱ्या कोणत्या विद्वानाने 'अलायन्स सिद्धांत' मांडला आहे की जो समाजातील विवाह संस्थेच्या महत्त्वावर भर देतो ?

(A) नाडेल

(B) रॅडक्लिफ ब्राऊन

(C) लेवी स्ट्राऊस

(D) कार्ल मार्क्स

36. मार्क्सची मांडणीतील 'क्लास-इन-इटसेल्फ' कशाच्या आधारे क्लास-फॉर-इटसेल्फ मध्ये परिवर्तित होतो ?

(A) संपत्ती

(B) संघर्षात्मक आर्थिक हितसंबंध

(C) वर्ग विरोध

(D) वर्ग जाणीव

37. Who among the following has classified society as Militant Society and Industrial Society ?

(A) Max Weber

(B) Herbert Spencer

(C) Emile Durkheim

(D) Karl Marx

38. Which of the following is *not* a type of authority given by Max Weber ?

(A) Ideal

(B) Legal

(C) Traditional

(D) Charismatic

39. The process used for making the criminal once again fit for accommodating in society is termed as :

(A) Adult socialization

(B) Re-socialization

(C) Socialization

(D) Sex-role socialization

37. खालीलपैकी कोणी समाजाचे सैनिकी समाज व औद्योगिक समाज असे वर्गीकरण केले आहे ?

(A) मॅक्स वेबर

(B) हर्बर्ट स्पेन्सर

(C) एमिल दुर्खिम

(D) कार्ल मार्क्स

38. खालीलपैकी कोणता अधिकाराचा प्रकार मॅक्स वेबरच्या विवेचनात **नाही** ?

(A) आदर्श

(B) विधिवत

(C) पारंपरिक

(D) करिश्माई

39. गुन्हेगाराला समाजात नव्याने सामावून घेण्यासाठी जी प्रक्रिया उपयोगात आणली जाते तिला काय म्हणतात ?

(A) प्रौढ सामाजीकरण

(B) पुन:सामाजीकरण

(C) सामाजीकरण

(D) लिंगभूमिकेचे सामाजीकरण

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



40. Which of the following method is called as unobstrusive method ?
(A) Case study
(B) Content analysis
(C) Survey
(D) Visual method

41. Which term is used to denote the middle value in a series of numbers ?
(A) Average
(B) Mean
(C) Median
(D) Mode

42. Which category of respondents can not be studied with the help of mailed questionnaire ?
(A) College students
(B) High officials in bureaucracy
(C) Clerks in Banks
(D) Illiterate persons of any age and sex

40. खालीलपैकी कोणत्या पद्धतीला हस्तक्षेप न करणारी पद्धती म्हणून संबोधले जाते ?
(A) व्यष्टी-अध्ययन
(B) आशय विश्लेषण
(C) सर्वेक्षण
(D) दृक् पद्धती

41. क्रममालिकेतील मध्यमूल्य सूचित करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?
(A) सरासरी
(B) मध्यमान
(C) मध्यांक
(D) बहुलक

42. पोस्टाने पाठवलेल्या प्रश्नावलीच्या सहाय्याने कोणता प्रकारच्या प्रतिसादींचे अध्ययन करता येत **नाही** ?
(A) महाविद्यालयीन विद्यार्थी
(B) नोकरशाहीतील वरिष्ठ अधिकारी
(C) बँकेतील कारकून
(D) कोणत्याही वयाच्या व लिंगाच्या निरक्षर व्यक्ती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



43. Oral History method becomes highly relevant in the context of :
   (A) Analysing life experiences of marginalised groups
   (B) Analysing relationship between variables
   (C) Analysing quantitative data
   (D) Analysing archival documents

44. The acceptance of a minority group by a majority population, in which the group takes on the values and norms of the dominant culture, is referred to as :
   (A) Assimilation
   (B) Acculturation
   (C) Integration
   (D) Accommodation

43. कोणत्या संदर्भात मौखिक इतिहास पद्धत सर्वाधिक समर्पक ठरते ?
   (A) सीमांत समूहांच्या जीवनानुभवांचे विश्लेषण
   (B) परिवर्त्यामधील संबंधांचे विश्लेषण
   (C) संख्यात्मक तथ्यांचे विश्लेषण
   (D) पुराभिलेख दस्तऐवजांचे विश्लेषण

44. एखादा बहुसंख्याक समूह अल्पसंख्य समूहाला स्वीकारतो आणि अल्पसंख्य समूह प्रभावी संस्कृतीतील नियमनांचा आणि मूल्यांचा स्वीकार करतो या स्थितीचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?
   (A) समावेशन
   (B) समसंस्कृतीकरण
   (C) एकात्मीकरण
   (D) समायोजन

www.prepp.in



45. A research technique in which the variables are kept under control is called :

(A) Interview

(B) Sampling

(C) Experiment

(D) Participant observation

46. The technique to isolate the effect of a particular independent variable on the dependent variable is known as :

(A) Multivariate analysis

(B) Deductive analysis

(C) Inductive analysis

(D) Abstract analysis

47. The indepth study of a phenomena is termed as :

(A) Content Analysis

(B) Participant Observation

(C) Case Study

(D) Life History

45. ज्या संशोधन तंत्रामध्ये चलांवर नियंत्रण ठेवलेले असते त्या तंत्राला काय म्हणतात ?

(A) मुलाखत

(B) नमुनापद्धती

(C) प्रयोगपद्धती

(D) सहभागी निरीक्षण

46. एका विशिष्ट स्वतंत्र परिवर्त्याचा परतंत्र परिवर्त्यावरील प्रभाव वेगळा काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तंत्राला काय म्हणतात ?

(A) बहुचर विश्लेषण

(B) निगमनात्मक विश्लेषण

(C) विगमनात्मक विश्लेषण

(D) अमूर्त विश्लेषण

47. एखाद्या घटनेच्या सखोल अध्ययनाला.......... म्हणतात.

(A) आशय विश्लेषण

(B) सहभागी निरीक्षण

(C) व्यष्टी अध्ययन

(D) जीवन वृत्तांत

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



48. Objectivity in social science research implies :

(A) Value reference

(B) Value judgement

(C) Value accommodation

(D) Value orientation

48. सामाजिक विज्ञानातील संशोधनातील वस्तुनिष्ठतेत काय गृहीत असते ?

(A) मूल्य संदर्भ

(B) मूल्य निर्णय

(C) मूल्य समावेशन

(D) मूल्य उद्‌बोधन

49. Which of the following is a type of non-probability sampling ?

(A) Simple Random Sampling

(B) Systematic Sampling

(C) Stratified Random Sampling

(D) Purposive Sampling

49. खालीलपैकी कोणता गैर-संभाव्यता नमुना निवडीचा प्रकार आहे ?

(A) साधा यादृच्छिक नमुना

(B) व्यवस्थाबद्ध नमुना

(C) स्तरित यादृच्छिक नमुना

(D) सहेतुक नमुना

50. Evaluating the behaviour of members of other group in terms of norms and values of one's own group is termed as :

(A) Cultural pluralism

(B) Cultural trait

(C) Sub-culture

(D) Ethnocentrism

50. दुसऱ्या समूहाच्या सदस्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन स्वतःच्याच समूहाच्या नियमने आणि मूल्यांच्या संदर्भात करण्याच्या कृतीचा निर्देश करण्यासाठी कोणती संज्ञा वापरली जाते ?

(A) सांस्कृतिक बहुविधता

(B) सांस्कृतिक गुण

(C) उप-संस्कृती

(D) स्वसमूहकेंद्रितता

www.prepp.in



ROUGH WORK

Prepp
Your Personal Exams Guide

www.prepp.in



**ROUGH WORK**

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No. **F**
प्रश्नपत्रिका क्र.

Signature of Invigilators
1. ........................................
2. ........................................

Seat No. ☐☐☐☐☐☐
(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ...........................
..............................................................

# SOCIOLOGY
## Paper II

# NOV - 14211

Answer Sheet No. ☐☐☐☐☐

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat Number in the space provided on the top of this page. Write your Answer Sheet No. in the space provided for Answer Sheet No. on the top of this page.
2. Write and darken Test Booklet No. on OMR Answer Sheet.
3. This paper consists of **Fifty (50)** multiple choice type of questions.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the responses as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   Where (C) is the correct response.
5. Your responses to the items for this paper are to be indicated on the Answer Sheet only. Responses like ( × ) ( ▯ ) ( / ) and **light shaded responses will not be considered/evaluated.**
6. Read instructions given inside carefully.
7. One Sheet is attached at the end of the booklet for rough work.
8. You should return the test booklet and answer sheet **both** to the invigilator at the end of the paper and should not carry any paper with you outside the examination hall.
9. Answers marked on the body of the question paper will not be evaluated.

### परीक्षार्थींसाठी सूचना

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक तसेच आपणास दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा.
3. या प्रश्नपत्रिकेत **पन्नास** बहुनिवड प्रश्न आहेत.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.
   **उदा.** (A) (B) ● (D)
   जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. उत्तराच्या रकान्यामध्ये ( × ) ( ▯ ) ( / ) व **अस्पष्टपणे काळे केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.**
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
9. प्रश्नपत्रिकेवर दर्शविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.